**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग**
**Phone (02362)228608/228847 Email collroffice@gmail.com**
**collddmo.si-mh@nic.in**

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महो

**क्र.जीआव्यप्रा/जा.सुच./१२/२०२२** **दि. ०७/१२/२०२२**

## जाहीर सूचना

दि.२३/११/२०२२ रोजी मा.प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार आणि या कार्यालयाच्या दि.०६/१२/२०२२ रोजी च्या मंजूर टिपणी नुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग द्वारा **'आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रम' सिंधुदुर्ग जिल्ह्यात राबविण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमात विविध सेवा पुरविणे साठी पुरवठादार यांची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता सदर कार्यक्रमांतर्गत करावयाच्या विविध बाबींसाठी पुढीलप्रमाणे** दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | दर (रु.) |
|---|---|---|
| १ | 'आपदा मित्र' प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सकाळी चहा-नाश्ता, दुपारचे व रात्रीचे जेवण, दोन वेळा चहा व बिस्किटे पुरविणे प्रती व्यक्ती येणा-या खर्चाचा दर द्यावा. | |
| २ | 'आपदा मित्र' प्रशिक्षण कार्यक्रमासाठी २०० प्रशिक्षणार्थी यांचेसाठी पेन, फोल्डर, Note Pad पुरविणे . प्रती नग दर द्यावा. | |
| ३ | 'आपदा मित्र' प्रशिक्षण कार्यक्रमाचे १२ दिवसाचे व्हिडीओ शुटींग , फोटोग्राफी करून त्याची सी.डी.सादर करणे तसेच संपूर्ण कार्यक्रमाची १० मिनिटाची documentry बनविणे . | |
| ४ | 'आपदा मित्र' प्रशिक्षण कार्यक्रमासाठी येणा-या स्वयंसेवकांना गादी, उशी, बेडशीट, चादर असा सेट पुरविणे. एका सेटची किंमत देणे. | |
| ५ | **'आपदा मित्र' प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी प्रशिक्षणार्थी यांचेसाठी आयोजित अभ्यास सहलीसाठी प्रवासाची व्यवस्था करणे.**<br><br>१०० प्रशिक्षणार्थी यांचे तुकडीसाठी प्रवासासाठी गाडी उपलब्ध करून देणे , ५० प्रवासी क्षमता असलेली गाडी चे रेट द्यावेत. ५० प्रवासी क्षमता असलेली गाडी उपलब्ध नसल्यास २० प्रवासी क्षमता असलेल्या गाडीचे रेट द्यावेत. | |

**सदर दरपत्रके जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे दिनांक ०८.१२.२०२२ ते दि.१४.१२.२०२२ या कालावधीत सकाळी ९.४५ ते संध्याकाळी ६.१५ या कार्यालयीन वेळेत स्वीकारली जातील. सदर दरपत्रके दि.१५.१२.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा इतर सोयीस्कर दिवशी उघडली जातील.**

**अटी व शर्ती**

(१) प्रत्येक कामासाठी स्वतंत्र दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे.

(२) दिलेल्या कामातील दरपत्रके मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. विहित कालावधीपेक्षा विलंबाने प्राप्त झालेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

(३) दरपत्रके मागविली म्हणून हे कार्यालय संबंधित दरपत्रक सादर करणारी व्यक्ती/संस्था यांना काम देण्यास बंधनकारक नाही.

(४) केवळ काम मिळावे म्हणून अवाजवी दर देवून अथवा गैर मार्गाने दरपत्रके मंजूर करून घेण्याचा प्रयत्न केल्यास अशी दरपत्रके अपात्र ठरविण्यात येतील.

(५) दरपत्रक सादर करणा-या व्यक्ती/संस्था यांनी मुदतीत वस्तूंचा/ सेवांचा पुरवठा न केल्यास, पुरवठा करण्यास नकार दिल्यास किंवा टाळाटाळ केल्यास आणि या कारणास्तव सदरचे काम मुदतीत पूर्ण न झालेस अथवा शासनाचे नुकसान झालेस दरपत्रक मंजूर झालेली व्यक्ती/संस्था हे दंडात्मक कारवाईस पात्र ठरतील.

(६) दरपत्रके उघडण्याच्या दिनांकात व वेळेत बदल करण्याचा अगर त्यासाठी वेगळा दिनांक निश्चित करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेले आहेत.

(७) पात्र दरपत्रक सादर करणारी व्यक्ती/संस्था यांचे सिंधुदुर्ग जिल्ह्यात कार्यालय, सेवाकेंद्र किंवा समन्वय अधिकारी असावा.

(८) दरपत्रक सादर करणारी व्यक्ती/संस्था यांना आपले वतीने सदरचे काम दुस-या व्यक्तीस/संस्थेस देता येणार नाही व एजंट नेमता येणार नाही. सदरचे कामाबाबत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सिंधुदुर्ग यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे दरपत्रक धारकास बंधनकारक असेल.

(९) दरपत्रक सादर करणा-या ज्या व्यति/संस्था यांनी सर्वात कमी दर दिलेले असतील त्या दरपत्रक धारक यांचेकडून सदर वस्तू/सेवा खरेदी करण्यात येईल अथवा या बाबतीत कार्यालयाच्या हिताचा निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सिंधुदुर्ग यांचा असेल.

(१०) सदर कामासाठी कोणतीही अग्रीम रक्कम या कार्यालयाकडून देण्यात येणार नाही.

(११) दरपत्रक मंजूर झाल्यावर प्रशिक्षण कार्यक्रमाच्या तारखा कळविण्यात येतील.

(१२) देयक प्रदान करताना दरपत्रकात नमूद केलेला दर आधारभूत मानून त्याप्रमाणे प्रत्यक्ष देयक आदा करण्यात येईल.

(१३) वरील अटी व शर्तीनुसार काम करावे लागेल. यात काही फेरबदल करावयाचे झाल्यास मा.जिल्हाधिकारी यांचे मंजुरीशिवाय कोणतेही फेरबदल करता येणार नाहीत. दरपत्रक सादर करताना दरपत्रक सादर करणा-या व्यक्ती/संस्था यांनी अटी व शर्ती मान्य असलेबाबत प्रमाणपत्र जोडावे.

(१४) अधिक माहितीकरिता दरपत्रक सादर करणा-या व्यक्ती/संस्था यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, सिंधुदुर्ग (०२३६२)२२८८४७ या क्रमांकावर सकाळी ०९.४५ ते ६.१५ या कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

(१५) दरपत्रके नामंजूर झाल्यास त्या संदर्भात या कार्यालयाकडून कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. दरपत्रके मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेला आहे.

(डॉ.जयकृष्ण फड)
**निवासी उपजिल्हाधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सिंधुदुर्ग**

**प्रत- १)मा.जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे नोटीस बोर्डवर प्रसिद्धीसाठी**
**२)जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी, (DIO, NIC) सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग च्या संकेत स्थळावर प्रसिद्धीसाठी**